महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175069609

# समाजकार्य अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची कर्नाटक, तमिळनाडूतील सेवाभावी संस्थांना भेट

कोल्हापूर, (महान्यूज अँड व्ह्यूज) :

समाजकार्याच्या अभ्यासामध्ये सैद्धांतिकतेबरोबरच प्रत्यक्ष कार्यानुभवालाही मोठे महत्त्व आहे. ही बाब लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठाच्या समाजकार्य अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी कर्नाटक आणि तमिळनाडूतील काही महत्त्वाच्या सामाजिक, सेवाभावी संस्थांना भेट देऊन त्यांच्या कार्याची माहिती घेतली.



शिवाजी विद्यापीठाच्या समाजकार्य विषयाच्या विद्यार्थ्यांनी नुकतीच कर्नाटकातील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेंटल हेल्थ अँड न्यूरोसायन्सेस, बंगलुरू, ओॲसिस इंडिया, कॅडबॅम्स हॉस्पिटल, अक्षयपात्रा फाऊंडेशन, स्टंप शूल अँड सोमप्पा स्प्रिंग्ज प्रा. लि., बंगलुरू, राणे ग्रुप, मैसुरू, आदिवासी संशोधन केंद्र, मैसुरू इत्यादी रुग्णालये, उद्योग समूह आणि स्थानिक सेवाभावी संस्थांना भेटी देऊन तेथील सोयीसुविधांची माहिती घेतली. या अभ्यास सहलीत एकूण ३२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. समाजकार्य अभ्यासक्रमाचे समन्वयक डॉ. उमेश गडेकर, डॉ. उर्मिला दशवंत आणि सौरभ धनवडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही सहल पार पडली.

या अभ्यास सहलीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना वर्गात शिकविल्या जाणाऱ्या सैद्धांतिक संकल्पनांचा प्रत्यक्ष क्षेत्रात अनुभव देणे, विविध सामाजिक संस्थांची कार्यपद्धती समजून घेणे आणि समाजकार्याच्या विविध क्षेत्रांतील संधींबाबत व्यापक दृष्टीकोन निर्माण करणे हा होता. मानसिक आरोग्य, व्यसनमुक्ती, पुनर्वसन, पोषण, आदिवासी विकास, समुदाय संघटन आणि शाश्वत विकास या विविध क्षेत्रांचा विद्यार्थ्यांनी अभ्यास केला.

बंगलुरूमधील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेंटल हेल्थ अँड न्यूरोसायन्सेस येथे विद्यार्थ्यांनी मानसिक आरोग्य सेवा, आधुनिक निदान पद्धती आणि बहुविद्याशाखीय उपचार प्रणालीचा अभ्यास केला. समाजकार्य विभागातील अधिकाऱ्यांनी मानसोपचार प्रक्रियेत समाजकार्यकर्त्यांची भूमिका, कुटुंब समुपदेशन, पुनर्वसन आणि समुदाय आधारित मानसिक आरोग्य कार्यक्रमांची माहिती दिली. ओॲसिस इंडिया संस्थेला दिलेल्या भेटीत विद्यार्थ्यांनी बेघर, व्यसनाधीन व्यक्ती आणि रस्त्यावरच्या मुलांसाठी राबविण्यात येणाऱ्या पुनर्वसन कार्यक्रमांची माहिती घेतली. तर, कॅडबॅम्स हॉस्पिटलमध्ये व्यसनमुक्ती उपचार, समुपदेशन आणि दीर्घकालीन पुनर्वसन प्रक्रियेबाबत जाणून घेतले. बंगलुरूमधील अक्षयपात्रा फाउंडेशन येथे विद्यार्थ्यांनी शालेय मध्यान्ह भोजन योजनेच्या अंमलबजावणीतील अत्याधुनिक स्वयंपाकगृह, गुणवत्ता नियंत्रण आणि वितरण व्यवस्थापन प्रणालीचा अभ्यास केला. म्हैसूर येथील आदिवासी संशोधन केंद्रात विद्यार्थ्यांना आदिवासी संस्कृती, परंपरा आणि विकास धोरणांविषयी माहिती मिळाली. याशिवाय, मनुष्यबळ विकास शिकणाऱ्या स्टंप शूल अँड सोमप्पा स्प्रिंग्ज प्रा. लि., बंगलुरू आणि राणे ग्रुप, मैसुरू येथे औद्योगिक व्यवस्थापन, उत्पादन प्रक्रिया आणि मानव संसाधन विकासाच्या पद्धतींचा अभ्यास केला. उटी येथे विद्यार्थ्यांनी स्थानिक समुदाय व स्वयंसहायता गटांशी संवाद साधून शाश्वत विकास, पर्यावरण संवर्धन आणि महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाच्या उपक्रमांविषयी माहिती घेतली.

महा न्यूज अँड व्ह्यूज

वामाक्षी
Hanuman Nagar, ITI,Pachgaon Road,
Front of Nimai Comer Appartment, Kolhapur.
Mob.- 9175009009

# महिलांना संधीचा अभाव ही गंभीर सामाजिक समस्या : डॉ. जगन्नाथ पाटील

कोल्हापूर, (महान्यूज अँड व्ह्यूज):

शालेय व महाविद्यालयीन परीक्षांमध्ये मुली सातत्याने अव्वल येत असतानाही उच्च शिक्षण, संशोधन आणि कामकाजाच्या ठिकाणी नेतृत्वाच्या पातळीवर त्यांचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी दिसते. ही संधीच्या अभावाची परिस्थिती समाजातील आर्थिक प्राधान्यक्रम, पितृसत्ताक मानसिकता आणि संस्थात्मक अडथळ्यांमुळे निर्माण झालेली गंभीर सामाजिक समस्या आहे, असे प्रतिपादन जागतिक ख्यातीचे शिक्षणतज्ज्ञ डॉ. जगन्नाथ पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त स्त्री अभ्यास केंद्र, बेटी बचाओ अभियान, श्रीमती शारदाबाई पवार अध्यासन, केंद्रीय तक्रार निवारण समिती आणि शिक्षणशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'महिला आणि मुलींसाठी हक्क, न्याय आणि कृती' या विषयावर आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत बीजभाषक म्हणून ते बोलत होते. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी होत्या, तर कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रमुख उपस्थित होते.

डॉ. पाटील म्हणाले, दहावी-बारावीच्या निकालांमध्ये मुली मोठ्या प्रमाणात अव्वल येतात. अनेक विद्यापीठांतील सुवर्णपदकेही मुलींनाच मिळतात; मात्र काही वर्षांनंतर या प्रतिभावान मुली उच्च शिक्षण, संशोधन किंवा व्यावसायिक क्षेत्रात फारशा दिसत नाहीत. शिक्षणाच्या प्रत्येक टप्प्यावर महिलांची संख्या कमी होत जाण्याच्या या प्रक्रियेला जगभरात 'लिकी पाइपलाइन' असे संबोधले



आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे महिलांच्या करिअरमध्ये येणारा खंड ही या समस्येची प्रमुख कारणे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जागतिक स्तरावरील अभ्यासांचा उल्लेख करताना डॉ. पाटील म्हणाले, विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रात शिक्षण घेताना मुलींचे प्रमाण चांगले असले तरी संशोधन आणि नेतृत्वाच्या पदांवर त्यांची उपस्थिती कमी आहे. महिलांना समान संधी दिल्यास देशाच्या आर्थिक वाढीतही मोठी भर पडू शकते. या समस्येवर उपाय म्हणून उच्च शिक्षणासाठी मुलींना अधिक शिष्यवृत्ती, कार्यक्षेत्रात लवचिक कामकाज पद्धती, बालसंगोपनासाठी आवश्यक सुविधा, तसेच शिक्षण व प्रशासनातील महत्त्वाच्या पदांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व वाढविण्याची गरज आहे. समाजातील मानसिकता बदलणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे सांगत, मुलींच्या शिक्षणाला व करिअरला प्राधान्य दिल्यास देशाच्या विकासाला नवी

विद्यार्थिनींची संख्या गेल्या दशकभरात सातत्याने ५० टक्क्यांहून अधिक राहिली आहे. तथापि, पुढील कारकीर्दीमध्ये त्यांचे प्रमाण तितके राहात नाही, हे चिंताजनक आहे. त्यासाठी महिला समानतेची आणि सक्षमीकरणाची सुरवात ही घरापासून होणे अत्यावश्यक आहे.

सुदृढ समाजासाठी महिलांना त्यांचे न्याय्य हक्क प्रदान करणे आवश्यक असल्याचे सांगताना प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, समतेच्या संदेशाचे सार्वत्रिकीकरण होत नाही, तोवर सुदृढ समाज घडणार नाही. स्त्रियांप्रती आदर असलेल्या समाजाचीच भरभराट होत असते. म्हणूनच महिला दिवस हा उत्सवीकरणाचा नव्हे, तर सक्षमीकरणाच्या संदर्भात आपण कुठवर पोहोचलो आहोत, याचे पुनरावलोकन करीत पुढील वाटचालीची दिशा निश्चित करण्याचा आहे, याचे भान बाळगणे गरजेचे आहे.

उद्घाटनानंतर दुसऱ्या सत्रात पुणे येथील जेएसपीएम विद्यापीठाच्या डॉ. ज्योती शिंदे, शहाजी लॉ महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. प्रविण पाटील आणि ज्येष्ठ संपादक डॉ. विजय चोरमारे यांनी मार्गदर्शन केले.

स्त्री अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. निशा मुडे-पवार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. शारदाबाई पवार अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी परिचय करून दिला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. चेतना सोनकांबळे यांनी आभार मानले. यावेळी मंचावर डॉ. माधुरी वाळवेकर, डॉ. प्रतिभा देसाई होत्या.

10 MAR 2026

पुढारी

# विद्यापीठातील विद्यार्थ्यांची सेवाभावी संस्थांना भेट

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या समाजकार्य अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी कर्नाटक आणि तामिळनाडूतील काही महत्त्वाच्या सामाजिक, सेवाभावी संस्थांना भेट देऊन त्यांच्या कार्याची माहिती घेतली.

समाजकार्य विषयाच्या विद्यार्थ्यांनी नुकतीच कर्नाटकातील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेंटल हेल्थ अँड न्यूरोसायन्सेस, बंगळूर, ओॲसिस इंडिया, कॅडबॅम्स हॉस्पिटल, अक्षयपात्रा फाऊंडेशन, स्टंप शूल अँड सोमप्पा स्प्रिंग्ज प्रा. लि., बंगळूर, राणे ग्रुप, म्हैसूर, आदिवासी संशोधन केंद्र, म्हैसूर आदी रुग्णालये, उद्योग समूह आणि स्थानिक सेवाभावी संस्थांना भेटी देऊन तेथील सोयी-सुविधांची माहिती घेतली. सहलीत ३२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. समाजकार्य अभ्यासक्रमाचे समन्वयक डॉ. उमेश गडेकर, डॉ. उर्मिला दशवंत व सौरभ धनवडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही सहल पार पडली.

10 MAR 2026
पुढारी

# विद्यार्थ्यांनी साकारली पोर्ट्रेट, लँडस्केप चित्रे!

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे दोन दिवसीय चित्रकला कार्यशाळा झाली. पोर्ट्रेट, लँडस्केप तसेच चित्ररचनेतील संतुलन, रंगसंगती करीत विद्यार्थ्यांनी चित्रे साकारली.

कार्यशाळेचा विषय 'पोर्ट्रेट, लँडस्केप अँड कॉम्पोझिशन' होता. दळवीज आर्टस् इन्स्टिट्यूटचे चित्रकार प्रा. अभिजित कांबळे यांनी मार्गदर्शन केले. अधिविभाग प्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांच्या मार्गदर्शनाखाली बबन माने, विजय उपाध्ये यांनी कार्यशाळेचे समन्वयन केले. कार्यशाळेसाठी प्राचार्य अजेय दळवी, डॉ. मानसिंग टाकळे, चित्रकार विजय टिपुगडे, संग्राम भालकर, सुदर्शन वंडकर, गजानन वाघमारे उपस्थित होते.

10 MAR 2026

पुढारी

# ऑक्टोबर २०२५ सत्राच्या विद्यार्थ्यांना परीक्षेची संधी

**कोल्हापूर :** ऑक्टोबर २०२५ मध्ये सत्र १/३/५ साठी परीक्षा अर्ज भरला नव्हता, अशा विद्यार्थ्यांना उन्हाळी सत्र २०२६ च्या परीक्षेसाठी सत्र १-२/३-४/५-६ चे परीक्षा अर्ज भरण्याची संधी शिवाजी विद्यापीठाने दिली आहे. राज्य अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी महासंघाने विद्यार्थी हित लक्षात घेऊन २७ फेब्रवारी रोजी शिवाजी विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक यांना निवेदन दिले होते.

10 MAR 2026
सकाळ



**सावर्डे सातवे :** येथे श्रीमती भागीरथी रामचंद्र यादव हायस्कूल येथे आकाश निरीक्षणासाठी उभारलेल्या आधुनिक दुर्बिण.

# पन्हाळ्यात विद्यार्थ्यांनी केले अवकाश निरीक्षण

पन्हाळा, ता. ९ : शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्र, पन्हाळा यांचे सहकार्याने श्रीमती भागीरथी रामचंद्र यादव हायस्कूल, सावर्डे येथे विद्यार्थ्यांसाठी आकाश निरीक्षण कार्यक्रम झाला.

अवकाश संशोधन केंद्राच्या तज्ज्ञांनी शाळेच्या प्रांगणात आधुनिक दुर्बिणी (टेलिस्कोप) उभारल्या होत्या. या माध्यमातून विद्यार्थ्यांनी चंद्रावरील विविध भौगोलिक रचना, खड्डे, पर्वतरांगा अगदी जवळून पाहिल्या. विशेष म्हणजे, यावेळी आकाशात दिसणारा गुरू ग्रह आणि त्याभोवती फिरकणाऱ्या उपग्रहांचे दर्शनही घडविले.

तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना ताऱ्यांचे जीवनचक्र, नक्षत्रांची ओळख, आकाशगंगा, ग्रह-उपग्रह यांची माहिती दिली. अवकाश संशोधक केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी मार्गदर्शन केले.

शिक्षक सत्यप्पा हजारे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तसेच शिवाजी विद्यापीठातील पदार्थविज्ञान विभागातील संशोधक विद्यार्थी किरण पती, स्वरूप चव्हाण आदींनी परिश्रम घेतले.

10 MAR 2026

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'एआय'च्या युगातही ग्रंथालयांचे महत्व अबाधित

## डॉ. ज्योती जाधव यांचे प्रतिपादन: शिवाजी विद्यापीठात ग्रंथपालनविषयक राष्ट्रीय परिषदेस प्रारंभ

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगामध्येही वाचनाचे, ग्रंथालयांचे महत्त्व अबाधित राहणार असून कोणतेही तंत्रज्ञान पुस्तकांना पर्याय ठरणार नाही, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले.




कोल्हापूर : परिषदेत बोलताना प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव सोबत डॉ. सचिनकुमार पाटील, डॉ. धनंजय सुतार, डॉ. मोहन खेरडे, डॉ. विनय पाटील, डॉ. एस.ए.एन. इनामदार.

महाराष्ट्र विद्यापीठे आणि महाविद्यालयीन ग्रंथपाल (मुकला) संघटना, शिवाजी विद्यापीठ शाखा, विद्यापीठाचे बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेत त्या बोलत होत्या. 'कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात ग्रंथपालन व्यवसायाचे भवितव्य" या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. मुकला संघटनेचे अध्यक्ष डॉ. खेरडे अध्यक्षस्थानी होते.

प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, एक शिक्षक आणि संशोधक म्हणून आयुष्याला ग्रंथांनी खरा आकार दिला. ३६ वर्षांच्या संशोधकीय वाटचालीमध्ये ग्रंथालये आणि त्यांच्या ग्रंथपालांचे योगदान खूप मोलाचे ठरले आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातही या मूळ स्रोतांचे महत्त्व अबाधित राहणार आहे. कारण वस्तुनिष्ठ माहितीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेलाही अंतिमतः ग्रंथांवरच अवलंबून राहावे लागणार असल्याचे सांगितले.

परिषदेचे संचालक डॉ. एस.ए.एन. इनामदार म्हणाले, कृत्रिम बुद्धिमत्ता, बिग डेटा व डिजिटल तंत्रज्ञानामुळे वर्तमानावर मोठा प्रभाव टाकत आहे. एआय-आधारित चॅटबॉट विद्यार्थ्यांना, संशोधकांना २४ तास संदर्भ आणि रेफर सेवा देऊ शकते. हे परिवर्तन साध्य करण्यासाठी, ग्रंथपालांना नवीन क्षमता आत्मसात करावी लागेल, असे मत त्यांनी व्यक्त केले. डॉ. मोहन खेरडे यांनी ग्रंथालये प्रभावी व उपयुक्त बनविण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा विचारविमर्श करण्याचे आवाहन केले.

प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांच्या हस्ते एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाच्या महर्षी धोंडो केशव कर्वे ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. विलास जाधव यांना यंदाचा 'मुकला सर्वोत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्काराने" सन्मानित केले.

डॉ. धनंजय सुतार यांनी स्वागत केले. डॉ. सचिनकुमार पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. विनय पाटील यांनी वार्षिक अहवाल सादर केला. एस.डी. हजारे आणि अमृता देसाई यांनी सूत्रसंचालन केले. उपग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर यांनी आभार मानले.

1 0 MAR 2026
तरूण भारत



कोल्हापूर : कार्यशाळेत सहभागी डॉ. विनोद ठाकूर-देसाई, प्रा. अभिजीत कांबळे, बबन माने, विजय उपाध्ये व विद्यार्थी-विद्यार्थिनी.

# शिवाजी विद्यापीठात पोर्ट्रेट, लँडस्केप चित्रकला कार्यशाळा



कार्यशाळेत व्यक्तीचित्रणाचे प्रात्यक्षिक दाखविताना प्रा. अभिजीत कांबळे

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे दोनदिवसीय चित्रकला कार्यशाळा शुक्रवारी झाली. 'पोर्ट्रेट, लँडस्केप अँड कॉम्पोझिशन" या विषयावर चित्रांची प्रात्याक्षिके सादर केली. दळवीज आर्टस् इन्स्टिट्यूटचे प्रसिद्ध चित्रकार प्रा. अभिजीत कांबळे यांनी विद्यार्थ्यांना चित्रकलेतील बारकावे प्रात्यक्षिकांसह समजावून सांगत मार्गदर्शन केले.

कार्यशाळेत विद्यार्थ्यांना पोर्ट्रेट, लँडस्केप तसेच चित्ररचनेतील संतुलन, रंगसंगती आणि मांडणी याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग घेत विविध प्रकारची चित्रे साकारली. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या भिंतीवर चित्रकला पदविकेच्या प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी साकारलेले भित्तीचित्र पाहून उपस्थितांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या चित्रांचे चित्रप्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. प्रदर्शनात पोर्ट्रेट, निसर्गचित्रे व विविध संकल्पनांवर आधारित चित्रांचा समावेश होता.

अधिविभाग प्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली बबन माने, विजय उपाध्ये यांनी कार्यशाळेचे समन्वयन केले. यावेळी प्राचार्य अजेय दळवी, डॉ. मानसिंग टाकळे, चित्रकार विजय टिपुगडे, संग्राम भालकर, सुदर्शन वंडकर, गजानन वाघमारे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 MAR 2026

पुढारी

# उच्च शिक्षण, संशोधनात महिलांच्या नेतृत्वाचा टक्का वाढणे गरजेचे

## डॉ. जगन्नाथ पाटील; शिवाजी विद्यापीठामध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शालेय आणि महाविद्यालयीन परीक्षांमध्ये मुली सातत्याने अव्वल येत असतानाही उच्च शिक्षण, संशोधन आणि कामकाजाच्या ठिकाणी नेतृत्वाच्या पातळीवर त्यांचे प्रमाण आजही कमी आहे. ही परिस्थिती केवळ कौटुंबिक नव्हे, तर समाजातील आर्थिक प्राधान्यक्रम, पितृसत्ताक मानसिकता आणि संस्थात्मक अडथळ्यांमुळे निर्माण झालेली एक गंभीर सामाजिक समस्या आहे, असे प्रतिपादन शिक्षणतज्ज्ञ डॉ. जगन्नाथ पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आयोजित 'महिला आणि मुलींसाठी हक्क, न्याय आणि कृती' या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळेत ते बीजभाषक म्हणून बोलत होते. यावेळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी होत्या, तर कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. जगन्नाथ पाटील म्हणाले, दहावी-बारावी आणि विद्यापीठीय निकालांत मुलींनाच सर्वाधिक सुवर्णपदके मिळतात; मात्र पुढील काही वर्षांत या प्रतिभावान मुली व्यावसायिक क्षेत्रातून मागे पडतात.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय महिला दिन कार्यशाळेत बीजभाषण करताना डॉ. जगन्नाथ पाटील. समवेत डॉ. व्ही. एन. शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. प्रतिभा देसाई, डॉ. निशा मुडे-पवार, डॉ. प्रवीण पाटील आदी. (छाया : पप्पू अत्तार)**

विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रांत मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण चांगले असले, तरी संशोधन आणि उच्च पदांवर त्यांची उपस्थिती नगण्य आहे. महिलांना समान संधी मिळाल्यास देशाच्या आर्थिक विकासाचा वेग अधिक वाढू शकतो.

कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी नमूद केले की, शिवाजी विद्यापीठात पदवी घेणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या गेल्या दशकभरात ५० टक्क्यांहून अधिक राहिली आहे. मात्र, करिअरच्या पुढच्या टप्प्यावर हे प्रमाण टिकून राहत नाही, ही चिंतेची बाब आहे. त्यामुळे महिला समानता आणि सक्षमीकरणाची सुरुवात घरापासून होणे अनिवार्य आहे.

या कार्यशाळेचे आयोजन स्त्री अभ्यास केंद्र, बेटी बचाओ अभियान, शारदाबाई पवार अध्यासन, केंद्रीय तक्रार निवारण समिती आणि शिक्षणशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. दुसऱ्या सत्रात पुणे येथील जेएसपीएम विद्यापीठाच्या डॉ. ज्योती शिंदे व शहाजी लॉ कॉलेजचे प्राचार्य डॉ. प्रवीण पाटील यांनी मार्गदर्शन केले. डॉ. निशा मुडे-पवार यांनी प्रास्ताविक केले, तर डॉ. भारती पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले आणि डॉ. चेतना सोनकांबळे यांनी आभार मानले. याप्रसंगी डॉ. माधुरी वाळवेकर, डॉ. प्रतिभा देसाई यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 MAR 2026 सकाळ

# मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य देणे गरजेचे

## डॉ. जगन्नाथ पाटील : विद्यापीठात आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त कार्यशाळा




शिवाजी विद्यापीठ : आंतरराष्ट्रीय महिला दिन कार्यशाळेत बीजभाषण करताना डॉ. जगन्नाथ पाटील. यावेळी उपस्थित डावीकडून डॉ. प्रतिभा देसाई, ज्योती शिंदे, निशा मुडे-पवार, प्रवीण पाटील, व्ही. एन. शिंदे, ज्योती जाधव, भारती पाटील, विजय चोरमारे आदी.

कोल्हापूर, ता. ९ : 'शालेय, महाविद्यालयीन परीक्षांमध्ये मुली सातत्याने अव्वल येत असतानाही उच्च शिक्षण, संशोधन आणि कामकाजाच्या ठिकाणी नेतृत्वाच्या पातळीवर त्यांचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी दिसते. ही संधीच्या अभावाची परिस्थिती गंभीर सामाजिक समस्या आहे. मुलींच्या शिक्षण, करिअरला प्राधान्य दिल्यास देशाच्या विकासाला नवी दिशा मिळू शकते', असे प्रतिपादन शिक्षणतज्ज्ञ डॉ. जगन्नाथ पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त स्त्री अभ्यास केंद्र, बेटी बचाओ अभियान, शारदाबाई पवार अध्यासन, केंद्रीय तक्रार निवारण समिती आणि शिक्षणशास्त्र अधिविभागाने घेतलेल्या 'महिला आणि मुलींसाठी हक्क, न्याय आणि कृती' या विषयावरील कार्यशाळेत बीजभाषक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव होत्या. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित होते.

डॉ. पाटील म्हणाले, 'कुटुंबातील आर्थिक निर्णयांमध्ये मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य देणे. ग्रामीण भागात मुलींना उच्च शिक्षणासाठी बाहेर पाठविण्याबाबतचा संकोच, विवाह आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे महिलांच्या करिअरमध्ये येणारा खंड ही या समस्येची प्रमुख कारणे आहेत.' प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, 'सुदृढ समाजासाठी महिलांना त्यांचे न्याय्य हक्क प्रदान करणे आवश्यक आहे.' कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, 'महिला समानतेची आणि सक्षमीकरणाची सुरुवात ही घरापासून होणे आवश्यक आहे.'

यावेळी डॉ. माधुरी वाळवेकर, प्रतिभा देसाई उपस्थित होत्या. स्त्री अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. निशा मुडे-पवार यांनी स्वागत केले. शारदाबाई पवार अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी परिचय करून दिला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. चेतना सोनकांबळे यांनी आभार मानले. दरम्यान, उद्घाटनानंतर दुसऱ्या सत्रात पुणे येथील जेएसपीएम विद्यापीठाच्या डॉ. ज्योती शिंदे, शहाजी लॉ महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. प्रवीण पाटील, ज्येष्ठ पत्रकार डॉ. विजय चोरमारे यांनी मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
10 MAR 2026
पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महिलांना संधीचा अभाव ही गंभीर समस्या

## –डॉ. जगन्नाथ पाटील

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शालेय व महाविद्यालयीन परीक्षांमध्ये मुली सातत्याने अव्वल येत असतानाही उच्च शिक्षण, संशोधन आणि कामकाजाच्या ठिकाणी नेतृत्वाच्या पातळीवर त्यांचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी दिसते. ही संधीच्या अभावाची परिस्थिती समाजातील आर्थिक प्राधान्यक्रम, पितृसत्ताक मानसिकता आणि संस्थात्मक अडथळ्यांमुळे निर्माण झालेली गंभीर सामाजिक समस्या आहे, असे प्रतिपादन जागतिक ख्यातीचे शिक्षणतज्ज्ञ डॉ. जगन्नाथ पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त स्त्री अभ्यास केंद्र, बेटी बचाओ अभियान, श्रीमती शारदाबाई पवार अध्यासन, केंद्रीय तक्रार निवारण समिती आणि शिक्षणशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'महिला आणि मुलींसाठी हक्क, न्याय आणि कृती' या विषयावर आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत बीजभाषक म्हणून ते बोलत होते.

डॉ. पाटील म्हणाले, दहावी-बारावीमध्ये मुली मोठ्या प्रमाणात अव्वल येतात. अनेक विद्यापीठांतील सुवर्णपदकेही



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय महिला दिन कार्यशाळेत बीजभाषण करताना डॉ. जगन्नाथ पाटील.**

मुलींनाच मिळतात; मात्र काही वर्षांनंतर या प्रतिभावान मुली उच्च शिक्षण, संशोधन किंवा व्यावसायिक क्षेत्रात फारशा दिसत नाहीत. शिक्षणाच्या प्रत्येक टप्प्यावर महिलांची संख्या कमी होत जाण्याच्या या प्रक्रियेला जगभरात 'लिकी पाईपलाईन' असे संबोधले जाते. कुटुंबातील आर्थिक निर्णयांमध्ये मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य देणे, ग्रामीण भागात मुलींना उच्च शिक्षणासाठी बाहेर पाठवण्याबाबतचा संकोच, तसेच विवाह आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे महिलांच्या करिअरमध्ये येणारा खंड ही या समस्येची प्रमुख कारणे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, शिवाजी विद्यापीठात पदवी घेणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या गेल्या दशकभरात सातत्याने ५० टक्क्यांहून अधिक राहिली आहे. तथापि, पुढील कारकिर्दीमध्ये त्यांचे प्रमाण तितके राहत नाही, हे चिंताजनक आहे. त्यासाठी महिला समानतेची आणि सक्षमीकरणाची सुरुवात ही घरापासून होणे अत्यावश्यक आहे.

अध्यक्षस्थानावरून प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, महिला दिवस हा उत्सवीकरणाचा नव्हे, तर सक्षमीकरणासंदर्भात आपण कुठवर पोहोचलो आहोत, याचे पुनरावलोकन करीत पुढील वाटचालीची दिशा निश्चित करण्याचा आहे, याचे भान बाळगणे गरजेचे आहे. उद्घाटनानंतर दुसऱ्या सत्रात पुणे येथील जेएसपीएम विद्यापीठाच्या डॉ. ज्योती शिंदे, शहाजी लॉ महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. प्रवीण पाटील आणि ज्येष्ठ संपादक डॉ. विजय चोरमारे यांनी मार्गदर्शन केले. स्त्री अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. निशा मुडे-पवार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. शारदाबाई पवार अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी परिचय करून दिला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. चेतना सोनकांबळे यांनी आभार मानले. यावेळी मंचावर डॉ. माधुरी वाळवेकर, डॉ. प्रतिभा देसाई होत्या.